
2019-20

Peer Reviewed Referred and
UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA



Volume-VIII, Issue-IV
October - December - 2019
Part - II

IMPACT FACTOR / INDEXING
2019 - 6.399
www.sjifactor.com

Ajanta
Prakashan

VOLUME - VIII, ISSUE - IV - OCTOBER - DECEMBER - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)

# CONTENTS OF PART - II


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | आदिवासी साहित्यातील बोलीभाषा व सांस्कृतिक दर्शन<br>**डॉ. रवींद्र मुरमाडे** | १-४ |
| २ | विदर्भाच्या राजकीय जनजागृतीत राष्ट्रसंतांच्या ग्रामगीतेचे योगदान<br>**प्रा. प्रफुल्ल आर. शेंडे** | ५-११ |
| ३ | वैदर्भीय मराठी कादंबरीकार प्रा. डॉ. विद्याधर बन्सोड यांच्या 'मुक्काम पोस्ट तेढा' कादंबरीचे मूल्यमापन<br>**प्रा. विद्या हिरामण देठे** | १२-१६ |
| ४ | 'वैकल्य' वैदर्भीय कादंबरी : एक आकलन<br>**प्रणाली खुशालराव कापसे** | १७-२२ |
| ५ | वैदर्भीय आदिवासी साहित्यातून प्रतिबिंबीत होणारा नक्षलवाद<br>**प्रा. मोक्षदा नाईक - मनोहर** | २३-२८ |
| ६ | अनुराधा पाटील यांची कविता<br>**प्रा. डॉ. बाबाराव मारोती ठावरी** | २९-३३ |
| ७ | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या ग्रामगीते मधील शिक्षक व विद्यार्थी यांची भूमिका<br>**प्रा. विकास सुरेश डुमणे** | ३४-३८ |
| ८ | वैदर्भीय मराठी कादंबरी 'राघववेळ' : अभिव्यक्तिचा शोध<br>**प्रा. महेश गेडाम** | ३९-४७ |
| ९ | विदर्भातील निवडक लोकगीते : एक आकलन<br>**डॉ. नरेंद्र तु. आरेकर** | ४८-५२ |
| १० | विदर्भातील आदिवासी काव्यधारा<br>**प्रा. डॉ. गणेश एन. चुदरी** | ५३-५६ |
| ११ | वारकरी संप्रदाय आणि वैदर्भिय संत<br>**प्रा. चिन्नना मेंगाजी चालुरकर** | ५७-६३ |
| १२ | वैदर्भीय मराठी कादंबरी<br>**डॉ. जनार्दन काटकर** | ६४-६६ |
| १३ | वैदर्भीय काव्यप्रवाह<br>**डॉ. सुधाकर भुयार** | ६७-६९ |
| १४ | मराठी गझलेचा वैदर्भीय सम्राट : सुरेश भट<br>**डॉ. राजेश देशपांडे** | ७०-७३ |

VOLUME - VIII, ISSUE - IV – OCTOBER - DECEMBER - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)

# १३. वैदर्भीय काव्यप्रवाह

**डॉ. सुधाकर भुयार**
कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, आर्वी, जि. वर्धा.

मराठीचे आद्यकवी विदर्भातील मुकुंदराजांपासून उगम पावलेला वैदर्भीय काव्यप्रवाह आजतागायत प्रवाहित आहे. विदर्भाला एक प्राचिन व समृध्द् परंपरा आहे. विदर्भाने प्राचिन काळापासून सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक वारसा जोपासला आहे. ज्याप्रमाणे विदर्भातील राजवटींनी इतिहासात आपले स्थान निश्चित केले त्याचप्रमाणे येथील वाङ:मयानेही मराठी साहित्येतिहासाची पाने सुवर्ण अक्षरांनी साकार केलेली आहेत. त्यातील काव्यप्रवाहांचा शोध आपल्याला येथे घ्यावयाचा आहे.

केशवसुतांपासून अर्वाचिन्न कवितेला प्रारंभ झाला, अर्वाचिन काळातील वैदर्भीय कवींचा विचार करतांना सर्वप्रथम श्रीपाद कृष्ण कोल्हटरांचा उल्लेख करावा लागतो. केशवसुतांचे समकालीन असणारे कोल्हटकर नाटककार म्हणून प्रसिध्द् असले तरी त्यांनी काही कविताही लिहिल्या आहेत. 'गितोपायन' हा त्यांचा संग्रह प्रसिध्द् आहे. केशवसुत संप्रदायक ज्याचा समावेश केल्या गेला आहे असे कवी 'बी' हे एक महत्वाचे वैदर्भीय कवी आहे. कवी नारायण मुर्लीधर गुप्ते ऊर्फ 'बी' हे विदर्भातील बुलढणा जिल्हयातल्या मलकापुरचे एक तत्वचिंतक कवी म्हणून प्रसिध्द्ी पावलेल्या कवी 'बी' यांचा 'फुलांची ओंजळ' हा एक रसिकमान्य कवितासंग्रह आहे. कवी 'बी' यांच्या काव्याचा तत्वज्ञान हाच मुख्य आधार आहे. याचा प्रत्यय त्यांच्या 'पिंगा' आणि 'चाफा' या गाजलेल्या कवितांमधून येतो. त्यांची 'कमळा' ही कविताही खुप गाजली. याच काळात एका वेगळया आशयाची अध्यात्मप्रवण रचना करणारे प्रज्ञाचक्षू गुलाबराव महाराज हे एक महत्वाचे वैदर्भीय कवी आहेत.

१९२० नंतर मराठी कविता खऱ्या अर्थाने बहरू लागली. या काळात विदर्भातील अनेक कविंनी आपले काव्यनेखन केले. यातील ज.के. उपाध्ये हे महत्वाचे कवी आहेत. त्यांचे 'पोपटपंची' (१९२०), लोकमान्य चरित्रामृत प्रथम खंड (१९२४), उमरखय्यामच्या 'रूबाया' व 'घटचर्चा' (१९३२) इत्यादी कवितासंग्रह प्रसिध्द् आहेत. ना. के. बेहरे यांचा 'मोत्यांची माळ' (१९३०) हा एक उल्लेखनीय कवितासंग्रह याचकाळात प्रसिध्द् झाला. ब. ग. खापर्डे यांचे 'अनंताची हाक' हे ईश्वरपर खंडकाव्य याच कालखंडात प्रसिध्द् झाले. यवतमाळचे गु. ह. देशपांडे यांचा 'निवेदन' (१९३५) हा कवितासंग्रह प्रसिध्द् असून त्यात जीव–जगत आणि ईश्वर या मुलतत्वांविषयीचे चिंतन आढळते. चंद्रपूरचे श्रीनिवास रामचंद्र उर्फ अन्नाजी बोबडे यांचा 'बाबेडे यांची कविता' (१९३७) हा कवितासंग्रह प्रसिध्द् आहे.

या कालखंडात लिहिणारे विदर्भातील महत्वाचे कवी म्हणजे कवी आनंद कृष्णाजी टेकाडे हे होत. त्यांची कविता 'आनंदगीत भाग–१' (१९२०), भाग–२ (१९२४), भाग–३ (१९२८) आणि भाग–४ (१९६१) अशा चार भागात प्रसिध्द् झालेली आहे. आनंद कृष्णाजी टेकाडे हे गायक म्हणून प्रसिध्द् होते. देशभक्ती,

राधाकृष्णप्रेम हे त्यांच्या कवितेचे विषय असुन त्यांनी आपली कविता आपल्याच बुलंद आवाजात घराघरात पोहचविली होती.

वामन नारायण देशपांडे यांनी याच काळात काव्यलेखन केले असून त्यांची 'विश्वोत्पती', 'तोच गीत ऐकतो', 'पऱ्यांची नगरी', 'स्वप्नमंदीर' इत्यादी संवादकाव्य प्रसिध्द आहेत. या कालखंडातील मुकूंद पाठक हे एक महत्वाचे कवी आहेत. 'पिंपळपान' (१९२६), 'शशिमोहन' (खंडकाव्य—१९२९), 'फुले व मुले' (१९३७), 'अग्नीकमळ' (१९९१) इत्यादी त्यांचे कवितासंग्रह प्रसिध्द आहेत. आधुनिक मराठी काव्याचे समीक्षक, भवानीशंकर श्रीधर पंडीत यांनीही या काळात काव्यलेखन केलेले आहेत. महानुभाव साहित्याचे अभ्यासक डॉ. वि. भि. कोलते यांनीही काव्यलेखन केले असून त्यांचा 'लव्हाळी' (१९३३) हा कवितासंग्रह प्रसिध्द आहे. या काळातील एक लोकप्रिय कवी भाऊसाहेब पाटनकर यांनीही काव्यलेखन केले आहे. त्यांना मराठीचे आद्यशायर म्हटल्या गेले आहे. त्यांच्या शायरीने मराठी रसिकांना मनमुराद आनंद दिला आहे. महाराष्ट्रातील संत परंपरेचा वारसा चालविणारे आधुनिक काळातील संत म्हणून ओळखले जाणारे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी आध्यात्मिक आणि राष्ट्रीय स्वरूपाची कविता लिहून वैदर्भीय काव्याला समृध्द केलेले आहे.

वैदर्भीय काव्यप्रवाहातील सर्वात महत्वाचे कवी म्हणजे कवी अनिल त्यांचे 'फुलवात' (१९३२), 'पेर्तेव्हा' (१९४७), 'सांगाती' (१९६१), 'दशपदी' (१९७६) हे चार कवितासंग्रह प्रसिध्द आहेत. याशिवाय 'प्रेम आणि जीवन' (१९३५), 'भग्नमुर्ती' (१९४०), 'निर्वासित चिनी मुलांस' (१९४२) ही खंडकाव्यही त्यांची प्रसिध्द आहेत. त्यांच्या कवितेचा गैरव साहित्य अकादमी पुरस्काराने झाला. प्रेमानुभूतीचा वेगळेपणा, मुक्तछंदाचे प्रवर्तन व प्रयोग खंड काव्याचा नवा रूपाविष्कार, सामाजिक जाणिवेचा मानवतावाद, निसर्ग—मानव—प्रेम यांतील एकरूपता, जीवनासक्ती, विकसनशिल व्यक्तिमत्व, भावसमृध्दता इत्यादी अनिलांच्या कवितेची ठळक वैशिष्टये दिसून येतात. अनिलांप्रमाणेच अतिशय प्रसिध्द कवी म्हणजे ना. घ. देशपांडे हे होत. 'शिळ' (१९५४), 'अभिसार खूणगाठी' (१९८५) हे त्यांचे कवितासंग्रह प्रसिध्द असून खूणगाठी या कवितासंग्रहासाठी त्यांना साहित्य अकादमी हा पुरस्कार मिळाला. बाबा आमटे हे नांव वैदर्भीय काव्यप्रवाहात महत्वाचे व वैशिष्टयेपूर्ण आहे. समाजसेवेसाठी आपले संपूर्ण जीवन समर्पित करणाऱ्या बाबा आमटेंच्या काव्यातही त्याचे पडसाद स्पष्टपणे उमटलेले दिसून येतात.

१९४५ ते १९६० या कालखंडातील महत्वाचे वैदर्भीय कवी म्हणजे शरच्चंद्र मुक्तिबोध त्यांचे 'नवी मळवाट' (१९४९) आणि 'यांत्रिक' हे दोन कवितासंग्रह प्रसिध्द असून त्यांच्या कवितांमधून त्यांची मार्क्सवादी विचारधारा स्पष्टपणे प्रकट झालेली आहे. याच काळात विदर्भातील बाळकृष्ण बन्नोरे, राम शेवाळकर, उ. रा. गिरी यांनीही लक्षणीय काव्यलेखन केलेले आहे.

एकूण मराठी कविंमधील ख्यातनाम वैदर्भीय कवी म्हणजे सुरेश भट 'रूपगंधा', 'रंग माझा वेगळा', 'एल्गार' इत्यादी त्यांचे कवितासंग्रह प्रसिध्द असून एक गितकार म्हणूनही त्यांनी नावलौकिक मिळविला. मराठी गझल त्यांनी सर्वदूर नेली. म्हणूनच त्यांचा उल्लेख म्हणूनच त्यांचा उल्लेख गझलसम्राट असा केला जातो.

सुरेश भटांच्या प्रेरणेने काव्यलेखन करणाऱ्या निसकांत ढोले यांनीही दर्जेदार गझला लिहिल्या आहेत. 'अग्निबन' (१९८०), 'कळा काळजाच्या' (२००३), 'वेदनांची वेधशाळा' (२०१०) हे त्यांचे कवितासंग्रह प्रसिध्द आहेत. आधुनिक मराठी कवितेत अभंगरचनेला नवे सामर्थ्य प्राप्त करून देण्याचे कार्य मधुकर केचे यांनी केले. त्यांचे 'दिंडी गेली पुढे' (१९५९), 'पुनवेचा थेंब' (१९६१) आणि 'आस्वांचा ठेवा' (१९६३) हे त्यांचे कवितासंग्रह प्रसिध्द् आहेत. श्रीधर शनवारे यांनी देखील लक्षेवेधक काव्यलेखन केलेले आहेत.

साठोत्तरी मराठी कवी परंपरेतील एक महत्वाचे वैदर्भीय कवी म्हणजे ग्रेस 'संध्याकाळच्या कविता', 'चंद्र माधवीचे प्रदेश', 'राजपूत्र आणि डार्लिंग' इत्यादी त्यांचे कवितासंग्रह प्रसिध्द् आहेत. एक प्रयोगशिल कवी म्हणून वसंत आबाजी डहाके यांचा गौरवाने उल्लेख करावा लागेल. १९७२ साली त्यांचा 'योगभ्रष्ट' हा पहिला कवितासंग्रह प्रसिध्द् झाला आणि त्यांच्या कवितांनी रसिकांचे लक्ष वेधून घेतले.

दलितसाहित्य प्रवाहात देखील अनेक वैदर्भीय कवींनी दर्जेदार काव्यलेखन केले आहे. त्यामध्ये वामन निंबाळकर, यशवंत मनोहर, लोकनाथ यशवंत, ज्योती लांजेवार यांचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. ग्रामीण साहित्यप्रवाहातही वैदर्भीय कवींनी आपल्या नावाचा ठसा उमटविला आहे. विठ्ठल वाघ, बबन सराडकर यांचा उल्लेख यासंदर्भात करावा लागेल. स्त्रीवादी काव्यप्रवाहामध्ये प्रभा गणोरकर, सुलभा हेर्लेकर, अंजनाबाई खुणे यांचा उल्लेख करावा लागेल. आदिवासी कवितेचा विचार करता डॉ. विनायक तुमराम, उषाकिरण आत्राम, सुखदेव उईके, प्रा. वामन शेळमाके, माधव सरकुंडे, दशरथ मडावी, बाबाराव मडावी, कृष्णकुमार चांदेकर, सुनिल कुमरे, वसंत कनाके, विठ्ठलराव कन्नाके, बाळकृष्ण तिरानकर, गोपाल आडे, प्रब्रम्हानंद मडावी, पितांबर कोडापे, पुरूषोत्तम कुमरे, कवडू आतराम इत्यादी कवींनी काव्यलेखन करून वैदर्भीय काव्यप्रवाह समृध्द् केला आहे.

याशिवाय तुळशिराम काजे, सचित्रा कातरकर, प्रतिमा इंगोले, ज्ञानेश वाकोडकर, मन्सूर ऐजाज जोश, जावेद पाशा इत्यादी कवींनी रसिकांचे लक्ष वेधून घेतले आहे. भावनांचा अविष्कार, मानवी वेदनेचे दर्शन, पार्थिवाचे भान आणि समकालीन जाणीवांचा आत्मशोधी स्वीकार ही या कवितेची वैशिष्टय दिसून येतात. विदर्भाच्या भूमित जन्माला आलेला हा वैदर्भीय काव्यप्रवाह आज मराठी काव्यसागरात एकरूप झालेला आहे. या काव्यप्रवाहात संतांचा भक्तीभाव व मानवप्रेम आहे, कवी मनाची कोमलता व राष्ट्रप्रेम आहे, समाजाच्या वेदना आहे, मधूर सुरांची व गितांची आरास आहे. मुक्तछंद, सुनित, लावणी, गौळण, रूबाई, गझल, हायकू, चारोळी, संवादिनी इत्यादींची विविधता आहे. शेरोशायरीचा रूबाब आहे. पोवाडयाची वीरता आहे, लावणीचा शृंगार आह, हायकूतील गुढ आहे, गझलेचा नजराना आहे. तसेच दलीत, आदिवासी, ग्रामीण, कष्टकरी, मुस्लीम मनाचा कोंडमारा आहे. या समग्र काव्यप्रवाहात केवळ शब्दांची आतिशबाजी नाही, अनुकरण नाही तर आपले स्वतंत्र स्वत्व जपणे आणि आविष्कृत करणे हा प्रमुख विशेष येथे प्रकर्षाने जाणवतो.

## संदर्भ

१) वाटाणे राजेंद्र – वैदर्भीय काव्यधारा, विजय प्रकाशन, नागपूर, २०११ प्रस्तावना.